# दिव्य वार्ता

## बीडमध्ये तिघे टॉवरवर चढले डॉ. संपदा मुंडेंना न्याय द्या म्हणत जोरदार घोषणाबाजी

बीड । दिव्य न्युज

डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी. महिला आयोगाच्या बेजबाबदार अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांचा राजीनामा घ्यावा. माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांच्यावर गुन्हा दाखल करावा आणि दोषींना कठोर शिक्षा करावी अशा आशयाचे निवेदन तयार करून येथील मोहन आघाव, माऊली सिरसाट आणि केशव तांदळे यांनी आज दुपारी शहरातील बशीरगंज भागातील बीएसएनएल टॉवरवर चढले होते. यावेळी टावरवर करून आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत गृहमंत्र्यांच्या राजीनामाची ही मागणी केली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी येऊन आंदोलकांना खाली उतरण्याची विनंती केली



वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि.२९ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# तयारीला लागा! स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक १० नोव्हेंबर रोजी आचारसंहिता लागण्याची शक्यता

## आयोगाकडून नगरपालिका निवडणुकीचा आराखडा तयार करण्यात आला,अधिसूचना लवकरच जारी केली जाणार



### फक्त विधेयकांची मंजुरी

निवडणुकांचा काळ असल्याने हिवाळी अधिवेशनात सरकारला नवीन योजनांची घोषणा करता येणार नाही, फक्त विधेयकांची मंजुरी इतकाच कार्यक्रम हाती घेता येणार असल्याची शक्यता आहे.

मुंबई । दिव्य न्युज

दिवाळीनंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याचे सातत्याने सांगितले जात आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापलेले आहे. स्थानिक निवडणुकांमुळे निवडणुकीचे जोरदार वारे वाहू लागले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिलेल्या आदेशानुसार ३१ जानेवारीपूर्वी निवडणुका घेण्याचे बंधनकारण केले आहे. त्यामुळे सर्वांच्या मनात निवडणुका कधी होणार? किती टप्प्यात होणार याबाबत उत्सुकता होती. अखेर याबाबत एक मोठी आणि महत्वाची अपडेट समोर आली आहे.

राज्यातील चार ते पाच वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अखेर मुहूर्त मिळाला आहे. त्यानुसार निवडणुकीची संभाव्य तारीख समोर आली आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम हा अंतिम टप्प्यात आहे. या निवडणुकीचा आराखडा अंतिम टप्प्यात आला असून, निवडणुका दोन टप्प्यात होऊ शकतात.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांची आचारसंहिता नागपूरचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना लागू शकते. त्यामुळे डिसेंबरअखेरपर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची घोषणा होऊ शकते, असा अंदाज वर्तवविण्यात आला आहे. तसेच नगरपालिका निवडणुका डिसेंबरमध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या आधी पूर्ण होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आयोगाकडून नगरपालिका निवडणुकीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. १० नोव्हेंबर रोजी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. या संदर्भातील अधिसूचना लवकरच जारी केली जाणार असल्याचे समजते. त्यामुळे राजकीय वर्तुळात हालचालींना वेग प्राप्त झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दोन टप्प्यात होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका होऊ शकतात. दुसऱ्या टप्प्यात महानगरपालिकेच्या निवडणुका होऊ शकतात. नगरपालिका निवडणुकीची आचारसंहिता नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात लागणार असल्याची शक्यता आहे. यानंतर महापालिका निवडणुका होणार असल्याचे सांगितले जात आहे. डिसेंबरअखेर महानगरपालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू शकते.

## डॉ.संपदा मुंडे प्रकरणातील दोषींना कठोर शासन करून मुंडे कुटुंबाला न्याय द्या-आ.संदीप क्षीरसागर

### उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेऊन दिले निवेदन



मुंबई । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कन्या डॉ.संपदा मुंडे यांच्या मृत्यू प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

बीड जिल्ह्यातील मौजे कोठरबन येथील रहिवासी असलेल्या व फलटण येथे कार्यरत असणाऱ्या डॉ.संपदा मुंडे यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण महाराष्ट्रासह देशात खळबळ उडाली आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे की, शिव-फुले-शाहू- आंबेडकर यांच्या विचारांवर चालणाऱ्या प्रगतशील महाराष्ट्र राज्यामध्ये एक महिला डॉक्टर आत्महत्या करण्यासारखे पाऊल उचलते या सारखे दुर्दैव नाही.फलटण येथील पोलिस प्रशासन व आरोग्य प्रशासनाच्या त्रासाला कंटाळून स्व.डॉ.संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली. यामुळे बीड जिल्ह्यात गंभीर पडसाद उमटले आहेत. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. डॉ.संपदा मुंडे यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करून मुंडे कुटुंबाला न्याय देण्याची मागणी बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवारांची भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

## आगामी बीड नगरपरिषद निवडणुकी करीता इच्छुक उमेदवारांनी जिल्हा कार्यालयात अर्ज करावेत-शहराध्यक्ष अमर नाईकवाडे



बीड । दिव्य न्युज

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे साहेब व जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या सूचनेप्रमाणे बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता शहरातील नगरसेवक, नगरसेविका व नगराध्यक्ष पदांकरिता निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाच्या जिल्हा कार्यालयात उमेदवारी करिता अर्ज करावेत.

नगरसेवक, नगरसेविका व नगराध्यक्ष पदांकरिता निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी १ नोव्हेंबर २०२५ ते ५ नोव्हेंबर २०२५ या कार्यकालात नाममात्र शुल्क भरून अर्ज घ्यावेत. सदरील पक्ष उमेदवारी अर्ज हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, जिल्हा कार्यालय, मित्र नगर, बीड येथे उपलब्ध असतील. एक नोव्हेंबर ते पाच नोव्हेंबर या कार्यकालात अर्ज घेऊन पुन्हा तो त्याच कालावधीत पक्ष कार्यालयात पक्षाचे कार्यालयीन सरचिटणीस श्री. महादेव अण्णा धांडे यांच्याकडे जमा करावयाचा आहे. १ ते ५ नोव्हेंबर या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ या कार्यालयीन वेळेत अर्ज घेऊन पुन्हा त्याच कालावधीत जमा करावयाचा आहे, याची सर्व इच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे केले आहे. उमेदवारी अर्ज पक्ष कार्यालयातूनच घ्यावा. नगरसेवक, नगरसेविका किंवा नगराध्यक्ष पदाकरिता इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज हा पक्ष कार्यालयातूनच नाममात्र शुल्क भरून घ्यावा. पक्ष कार्यालयातून घेतलेला अर्जच ग्राह्य धरण्यात येईल

## माजी क्रिकेटर अझरुद्दीन यांना मंत्रिपद, तेलंगाणामध्ये मोठे उलटफेर!





### अझरुद्दीन यांना मंत्रिपद दिले जाणार

मिळालेल्या माहितीनुसार येत्या ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी अझरुद्दीन यांचा मंत्रिमंडळात समावेश केला जाणार आहे. ११ नोव्हेंबर रोजी ज्युबली हिल्स विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे. हीच बाब लक्षात घेता अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधित्त्व म्हणून अझरुद्दीन यांना मंत्रिपद दिले जाणार आहे, असे सांगितले आत आहे. ज्युबली हिल्स या मतदारसंघात मुस्लीम मतदारांची संख्या लक्षणीय आहे. ही निवडणूक जिंकायची असेल तर मुस्लिमांची मतं मिळणं गरजेचे आहे. त्यामुळेच काँग्रेसने हा निर्णय घेतल्याचे राजकीय जाणकार सांगत आहेत.

मुंबई । दिव्य न्युज

तेलंगाणा सरकारमध्ये लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून तेलंगाणातील काँग्रेस सरकार नेमकं कोणत्या नेत्याला मंत्री होण्याची संधी देणार? असे विचारले जात होते. असे असतानाच आता तेथील सत्ताधारी काँग्रेसने सर्वांनाच अचंबित करणारा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार तेथे विधानपरिषदेवर आमदार म्हणून गेलेल्या माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन यांना मंत्रिपद मिळणार आहे. आगामी काळात होणारी ज्युबली हिल्स विधानसभा पोटनिवडणूक लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

**ऑगस्टमध्ये मिळाली आमदारकी**

अझरुद्दीन यांना ऑगस्ट महिन्यात काँग्रेसने विधानपरिषदेत आमदारकी दिली होती. अझरुद्दीन हे राज्यपाल नियुक्त आमदार आहेत. त्यांचे नाव सुचवण्याआधी काँग्रेसने कोडांदारम आणि अमेर अली खान यांच्या नावांची राज्यपालांकडे शिफारस केली होती. मात्र राज्यपालांनी या नेत्यांची शिफारस फेटाळून लावली होती. त्यानंतर आंध्र प्रदेश सरकारने कोडांदारम आणि अझरुद्दीन यांचे नाव सुचवले होते. ही शिफारस मान्य केल्यानंतर आता अझरुद्दीन आमदार आहेत. लवकरच ते मंत्री होतील.

**मंत्रिमंडळात मुस्लीम नेत्याला स्थान नाही**

तेलंगाणातील काँग्रेस सरकारच्या मंत्रिमंडळात अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी म्हणून एकाही मुस्लीम नेत्याचा समावेश नव्हता. त्यामुळे अल्पसंख्याकांमध्येही काहीशी नाराजी होती. हीच नाराजी दूर करण्यासाठी तसेच सर्व वर्गाचे प्रतिनिधी मंत्रिमंडळात असावेत यासाठीही अझरुद्दीन यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अझरुद्दीन यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या १६ वर पोहोचेल. आंध्र प्रदेशच्या मंत्रिमंडळात मुख्यमंत्र्यांसह जास्तीत जास्त १८ मंत्री असू शकतात. रेवंत रेड्डी यांनी ७ डिसेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यानंतर आता पहिल्यांदाच मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात येत असून अझरुद्दीन यांनी मंत्रिपद देण्यात येणार आहे. त्यामुळे आता या निर्णयाचा काँग्रेसला ज्युबली हिल्सच्या पोटनिवडणुकीत किती फायदा होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## बच्चू कडू आणि आंदोलकांनी ठिय्या आंदोलन स्थळावरुन बाजूला व्हावं, नागपूर खंडपीठाचे आदेश



नागपूर । दिव्य न्युज

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी ठिय्या आंदोलन सुरु केलं आहे. बच्चू कडू यांच्याकडून कर्जमाफीच्या मागणीसाठी महाएल्गार आंदोलन सुरु करण्यात आलं होतं. आंदोलन २८ तारखेपासून सुरु झाल्यानंतर आज आंदोलनाचा दुसरा दिवस आहे. ठिय्या आंदोलनामुळं होणाऱ्या प्रवाशांच्या गैरसोईची मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठानं सुमोटो दखल घेतली आहे. बच्चू कडू यांनी आज संध्याकाळी सहा वाजेपर्यंत स्वतःला आणि स्वतःच्या आंदोलन सहकाऱ्यांसह ठिय्या आंदोलन सुरू असलेल्या स्थळावरून बाजूला व्हावे असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहे.

बच्चू कडू यांना आंदोलनासाठी २८ ऑक्टोबर साठीची आणि तीही परसोडी गावाजवळच्या मैदानावरील आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती.ती परवानगी २८ तारखेसाठी होती. मात्र, ठिय्या आंदोलन आज म्हणजे २९ तारखेला ही सुरू आहे आणि त्यामुळे लोकांना खास करून रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना त्रास होत आहे.परिसरात अनेक रुग्णालये सुद्धा आहेत. अनेक रुग्णांना त्रासाचा सामना करावा लागला आहे, असे सुद्धा नागपूर खंडपीठाच्या आदेशात म्हणण्यात आले आहे.आदेशात १ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरंगे पाटील यांचे आंदोलनासंदर्भात जी याचिका स्वीकारली होती त्याचा उल्लेखही करण्यात आला आहे...

पोलीस अधिकाऱ्यांनी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ठिय्या आंदोलन सुरू असलेली जागा मोकळी करण्याची प्रक्रिया सुरू करावी असेही आदेशात म्हटले आहे. तसेच नागपूरच्या पोलीस आयुक्तांनी आदेशाची पूर्तता केल्यासंदर्भातील रिपोर्ट उद्या सकाळी ११ वाजेपर्यंत सादर करावी असेही न्यायालयाने म्हटले आहे. संबंधित क्षेत्राचे पोलीस अधिकारी तसेच महामार्ग पोलिसांनी आदेशाची पूर्तता करावी असेही न्यायालयाने त्यांच्या निर्देशात म्हटले आहे.

## गेवराईत पंकजा मुंडेंची खेळी; बदामराव पंडितांच्या पक्षप्रवेशाने ‘स्थानिक’मध्ये भाजपचा जोर वाढणार!



मुंबई । दिव्य न्युज

माजी मंत्री बदामराव पंडित यांचा भाजप प्रवेश बीड जिल्ह्यातील राजकारणात पक्षासाठी टर्निंग पॉईंड ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या लक्ष्मण पवारांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी दाखल केली. त्यांच्यावर पक्षाने कुठलीही कारवाई केली नसली तरी ते फारसे सक्रीय नव्हते. अशावेळी आगामी जिल्हा परिषद, नगरपरिषद, पंचायत समिती निवडणुका पाहता मंत्री पंकजा मुंडे यांनी बदामराव पंडित यांना पक्षप्रवेश देत बेरजेचे राजकारण केले.

गेल्यावेळी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत पंकजा मुंडे यांनी सत्तेची जी समीकरणं जुळवून आणली त्यात बदामराव पंडीत यांच्या पाच सदस्यांची मदत त्यांना झाली होती. पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमात पंकजा मुंडे यांनी ही आठवण आवर्जून सांगितली होती. सहा महिन्यापासून पक्ष प्रवेशाच्या तयारी असलेल्या बदामराव पंडीत यांच्या भाजप प्रवेशाला अखेर दिवाळीचा मुहूर्त लागला. गेवराईत विजयसिंह पंडित हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार आहेत. तालुक्याच्या राजकारणात बदामराव पंडित विरुद्ध अमरसिंह, विजयसिंह पंडित यांच्यात कायम संघर्ष राहिला आहे. विजयसिंह पंडित हे चुकून निवडून आलेले आमदार आहेत, पैसे देऊन ते आमदार झालेत, असा हल्लाबोल बदामराव पंडीत यांनी केला आहे. एकूणच भाजपमधील प्रवेशानंतर बदामराव पंडित अधिक आक्रमक होण्याची शक्यता आहे. गेवराईत पुन्हा काका विरुद्ध पुतण्या असा थेट संघर्ष स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत दिसणार आहे. गेवराईत या प्रवेशाने भाजपाची ताकद निश्चित वाढणार आहे. जिल्हा परिषदेच्या सत्तेसाठी हा प्रवेश अत्यंत महत्वाचा ठरू शकतो. पंकजा मुंडे यांच्यावतीने आयोजित परळीतील दिवाळी स्नेहमिलन सोहळ्यात हा प्रवेश साधेपणाने पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आपण पक्षात काम करणार असल्याचे बदामराव पंडित यांनी म्हटले आहे. बदामराव हे गेवराई मतदारसंघातून तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. १९९५ आणि १९९९ अशा सलग दोन विधानसभा निवडणुका ते अपक्ष लढले आणि जिंकले. तर २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर ते आमदार झाले होते. २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीत ते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढले पण त्यांचा पुतणे विजयसिंह पंडित यांच्याकडून ४२ हजार मतांनी पराभव झाला. आता गेवराईच्या विकासासाठी नवीन अध्याय सुरू करण्याची गरज असल्याचे बदामराव यांनी म्हटले आहे. पंकजा ताईंच्या कार्यपद्धतीतून मला प्रेरणा मिळते आणि मी भाजपच्या वाढीसाठी स्वतःला समर्पित करेन, अशी भावना त्यांनी पक्षप्रवेशाच्या वेळी व्यक्त केली होती.

# नवीन एसटी स्टँडची दैनिय अवस्था

## स्टँडमध्ये अस्वच्छता, सफाईचे झाडू कंट्रोल केबिनला

### पार्किंग नसल्याने स्थानकाला वाहनांचा गराडा : धुळीचे लोट, कचरा, घाणच घाण, प्रवाशांपेक्षा अवैध वाहतुकीच्या दलालांचा गोंगाट जास्त





बीड बसस्थानकावर घाणीचे साम्राज्य पसरले असून, नवीन बसस्थानक असूनही स्वच्छतेकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे.



बसस्थानकातील सर्वच फलाटासमोर कागद, कचरा, रॅंपर, बाटल्या दिसतात.

### स्थानकाची शोभा राखा

**बीड बसस्थानकाच्या दोन्ही बाजूने वाहतूक सुरू आहे; परंतु कोट्यवधी रुपये खर्चून होत असलेल्या या नवीन बसस्थानक इमारतीच्या भिंती तंबाखू, पान, गुटख्याच्या पिचकारीने रंगलेल्या दिसतात. प्रवाशांनीही अशा बाबी टाळल्या पाहिजेत. एस.टी.च्या अधिकाऱ्यांनी स्थानकाच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष दिले पाहिजे.**

**सीताराम बांगड, प्रवासी, बीड**

बीड । दिव्य न्युज

येथील नवीन बसस्थानकाचे काम प्रगतिपथावर असतानाच ते प्रवासी सेवेसाठी सुरू केले; परंतु स्थानकाच्या देखभाल, दुरुस्तीकडे आगारप्रमुख, स्थानक प्रमुखांचे दुर्लक्ष झाल्याने प्रवाशांना जागोजागी साचलेली धूळ, कचरा व अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे तर तंबाखू, पानाच्या पिचकाऱ्यांनी भिंती रंगल्या आहेत. नव्या इमारतीची रंगरंगोटी करूनही लोक धुंकून घाण करत आहेत. सफाई कर्मचारी काय करतात? व त्यांच्यावर नियंत्रण कोणाचे? असा प्रश्न आहे. येथील जुन्या बसस्थानकाची इमारत पाडून नवीन इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. सणासुदीत प्रवाशांची गर्दी लक्षात घेत नवीन स्थानकाच्या दोन्ही बाजूने ८ पॉइंट तयार करून १६ फलाट तयार केले. त्यामुळे प्रवाशांची गर्दी नियंत्रणात आली. परंतु स्वच्छतेचे तीनतेरा झाले आहे. कचरा, धुळीशी प्रवाशांचा सामना नवीन बसस्थानक परिसरात जागोजागी घाण, फलाटासमोरील जागा धुळीने व्यापली आहे. खाद्यपदार्थाचे रॅपर, रिकाम्या बाटल्या, कागद, कचरा तासन्-तास तसाच पडून राहिल्याने कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. खराटा फिरवून थातूर-मातूर काम केले जात असल्याने प्रवाशांना नाक दाबून तोंड झाकून वावरावे लागते.

### दुचाकी, चारचाकी थेट फलाटापर्यंत

स्थानकाच्या दोन्ही बाजूच्या फलाटावरून बससेवा सुरू आहे. दोन ठिकाणी नो पार्किंग, दंड ५०० रुपये, अशी भिंत रंगविली आहे; परंतु स्थानकाच्या सर्वच बाजूने दुचाकी उभ्या केल्या जातात तर चारचाकीदेखील थेट फलाटापर्यंत आणली जाते, यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, बसचालकांना अडथळा होतो.



बसस्थानक परिसरात वाहने पार्किंगसाठी जागा निश्चित नसल्याने कोणीही कुठेही वाहने उभी करतात.

### आगारप्रमुख नॉट रिचेबल

आगारप्रमुख तिडके यांना संपर्क केला असता त्यांचा फोन बंद होता तर रविवारी सकाळी स्वतः उभे राहून स्थानकात सफाई करून घेतली. स्थानकाचा परिसर मोठा असल्याने कामगारांची संख्या वाढवून सफाई कामात सातत्य ठेवले जाईल. प्रवाशांची अडचण होणार नाही, असे वाहतूक निरीक्षक भीमकिरण बनसोडे म्हणाले.

### ७५ हजार

रुपयांपर्यंत खर्च चार कामगारांवर दरमहा केला जातो. बसस्थानकात सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत दोन तर दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत दोन सफाई कामगार नेमले आहेत. हे कामगार अस्थायी स्वरुपात नेमले असले तरी सफाई करण्याऐवजी इकडे-तिकडे फिरत असताना दिसतात. या कामगारांचे झाडू नियंत्रण कक्षात अनेकदा दिसून आलेले आहेत.

### संध्याकाळ होताच अवैध प्रकार

संध्याकाळनंतर बसस्थानक परिसरात तळिराम, गुन्हे तसेच अवैध व्यवसाय करणाऱ्यांची वर्दळ वाढते. त्यामुळे प्रवासी सुरक्षितता धोक्यात येते. कर्तव्यावर नेमलेले पोलिस कर्मचारी काय करतात? याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज आहे. या भागात एचटीयू विभाग तसेच पोलिसांनी ठोस कारवाया करून गुन्हेगारी नियंत्रणात आणावी, अशी मागणी आहे.

### खासगी वाहतूकदारांना कोणाचा आशीर्वाद

बसस्थानक परिसरात दररोज खुलेआम अवैध प्रवासी वाहतूक सुरू आहे. प्रवासी गोळा करण्यासाठी अनेक दलाल गावांची नावे घेत ओरडतात. हा आवाज स्थानकातील संबंधित अधिकारी, पोलिस कर्मचाऱ्यांना ऐकू येत नाही अन् दिसत नाही. स्थानक परिसरातून होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीला आशीर्वाद कोणाचा? याचा शोध पोलिस व एस.टी.चे वरिष्ठ अधिकारी घेणार आहेत का? असा प्रश्न प्रवासी विचारतात.

---

## अत्तार वेल्फेअर ट्रस्टअंतर्गत 'रहनुमा-ए-मिल्लत' युनिटची स्थापना

बीड । दिव्य न्युज

अत्तार वेल्फेअर ट्रस्टच्या मार्गदर्शनाखाली रहनुमा-ए-मिल्लत या नावाने एक नवीन सामाजिक आणि कल्याणकारी युनिटची स्थापना करण्यात आली आहे. या निमित्ताने आज एक साधा पण प्रभावी कार्यक्रम आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये समाजातील मान्यवर नागरिक आणि तरुणांनी उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमात ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर केले की, रहनुमा-ए-मिल्लतचे प्रमुख उद्दिष्ट समाजामध्ये शिक्षण, आरोग्य, खेळ, महिला व बालकल्याण, वृद्ध व दिव्यांग सेवा, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण अशा महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर जनजागृती करणे असेल.

या प्रसंगी खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली अध्यक्ष - मौलाना तारिक अन्वर उपाध्यक्ष -मौलाना मोहसिन इशाअती सचिव - मौलाना मुश्ताक साहेब अशरफी कोषाध्यक्ष / कार्यवाहक - मुफ्ती मुख्तार साहेब अशरफी

समारंभात वक्त्यांनी असे सांगितले की, रहनुमा-ए-मिल्लत समाजसेवेच्या भावनेने कार्य करून समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत कल्याणकारी सेवा पोहोचवेल आणि समाजाच्या प्रगतीत मोलाची भूमिका बजावेल. कार्यक्रमाचा समारोप दुआने करण्यात आला.

## परभणीत वॉक फॉर युनिटी उत्साहात साजरी



परभणी । दिव्य न्युज : सालेह चाऊस

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त परभणी जिल्हा पोलिस दल व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी(दि. २८क्टोबर) सकाळी वॉक फॉर युनिटी'चे आयोजन करण्यात होते.

या वॉक फॉर युनिटीमध्ये जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, अपर पोलिस अधिक्षक सुरज गुंजाळ, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी आणि परभणी पोलिसांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होते .

## कर्जमाफीसाठी परभणीत संतप्त शेतकऱ्यांने जिल्हाधिकाऱ्यांची गाडी फोडली



परभणी । दिव्य न्युज : सालेह चाऊस

अतिवृष्टी आणि पिक नुकसानीची मदत न मिळाल्याने, महायुती सरकारने शेतकरी विरोधी धोरण अंगिकारल्याच्या निषेधार्थ संतप्त शेतकर्याने जिल्हाधिकार्यांची गाडी फोडल्याची घटना मंगळवारी (दि. २८ क्टोबर) दुपारी घडली.

संतोष रावण पैके रा. चाटोरी ता. पालम असे संतप्त शेतकर्याचे नाव आहे. परभणी जिल्हयात सर्वदूर अनेकवेळा अतिवृष्टी झाल्याने आणि पुराचे पाणी शेतात शिरल्याने लाखो हेक्टर जमीनीवरील पिके जनावरे,वाहुन गेली. शासनाने जाहीर केलेली मदत दिवाळीपूर्वी न मिळाल्याने शेतकर्यांनी काळी दिवाळी साजरी केली. तसेच महायुती सरकारने शेतकरी विरोधी धोरण अंगिकारल्याने शेतकर्यांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी संतोष पैके यांच्या संतापाचा उद्रेक झाला. घटनास्थळावरून शेतकरी संतोष पैके यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

---

## मुख्यमंत्री हे क्लीनचीटर आहेत-कॉँग्रेसचे राष्ट्रीय सचिव रवींद्र दळवींचा आरोप

### कवडगाव मध्ये मुंडे कुटूंबियाची भेट घेऊन सांत्वन केले :स्व.डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण




### रवींद्र दळवींचा राहुल गांधींना फोन

भारताच्या लोकसभेचे विरोधी पक्ष नेते मा. राहुल गांधी यांनी कालच ट्विट केले होते की डॉक्टर संपदाचा मृत्यू दुर्दैवी मृत्यू आहे.त्याच अनुषंगाने आज कॉँग्रेसचे राष्ट्रीय सचिव रवींद्र दळवी यांनी राहुल गांधी यांना फोन करून या घटनेबाबत सविस्तर माहिती सांगितली. ती माहिती ऐकून राहुल गांधी यांनी मुंडे कुटुंबीयांना फोन करून काय प्रकरण झाले याबद्दल सविस्तर चर्चा केली.आणि सांगितले की डॉक्टर संपादा मुंडे यांना न्याय मिळवून देऊ! न्याय नाही मिळाल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा राहुल गांधीसह रवींद्र दळवी व सुशीलाताई मोराळे यांनी दिला आहे.

वडवणी । दिव्य न्युज

वडवणी तालुक्यातील कोठारबंन येथील रहिवासी असलेले व सध्या कवडगाव येथे वास्तव्यास असलेले श्रीकृष्ण मुंडे यांची मुलगी स्व डॉ संपदा मुंडेंनी फलटणमध्ये आत्महत्या केली यासंदर्भात नेमकी आत्महत्या की खून असा प्रश्न उभ्या महाराष्ट्राला पडला आहे त्या अनुषंगाने आज दिनांक २७-१०-२०२५ रोजी कॉँग्रेसचे राष्ट्रीय सचिव रवींद्र दळवी यांनी नुकतीच मुंडे कुटुंबियांच्या घरी भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.

सविस्तर वृत्त असे की, गेल्या दोन ते चार दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रामध्येच नव्हे तर देशामध्ये डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण गाजत आहे. डॉक्टर संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली की त्यांचा खून केला याचे धागेदोरे अजूनही लागलेले नाहीत. मात्र मुख्यमंत्र्यांनी स्टेजवरच राजकीय पुढार्यांना क्लीन चीट दिल्याने महाराष्ट्रामध्ये संतापाची लाट पसरली आहे. आणि त्याच अनुषंगाने आज कवडगाव मध्ये कॉँग्रेसचे राष्ट्रीय सचिव रवींद्र दळवी यांनी मुंडे कुटुंबीयाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व मुख्यमंत्र्यांनी क्लीनचीट दिल्यामुळे हे मुख्यमंत्री क्लीनचीटर आहेत असा आरोप रवींद्र दळवी यांनी पत्रकारांशी बोलताना केला. कुटुंबीयांशी बातचीत केली असता कुटुंबातील सदस्यांनी सांगितले की,डॉक्टर संपदा मुंडे ही आत्महत्या करणारी मुलगी नसून तिचा खून झाला आहे आणि याच्यामध्ये पोलीस प्रशासनातील मोठमोठे अधिकारी व तेथील राजकीय पुढारी असून चारी बाजूने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. आम्हाला फक्त न्याय हवा आहे अशा शब्दात आई-वडिलांनी यांनी परिवारातील सदस्यांनी रवींद्र दळवी व सुशीलाताई मोराळे यांच्यासमोर आक्रोश मांडला. ज्या ठिकाणी आत्महत्या केली त्या ठिकाणचे सर्व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय कुटुंबीयांनी बोलून दाखवला. कुटुंबातील सदस्य यांनी सांगितले की आम्ही फलटणमध्ये येण्या अगोदरच डॉक्टर संपदा मुंडे यांचा मृतदेह दवाखान्यामध्ये घेऊन गेले होते. त्यामुळे संशय अधिकच बळावला. डॉक्टर संपदा मुंडे यांचा मोबाईल पोलिसांनी जप्त केला मात्र दुपारी आत्महत्या केलेल्या डॉक्टर संपदा मुंडे यांच्या मोबाईल रात्री अकरा वाजता सुरू होतो हे आश्चर्यकारक आहे. एवढेच नव्हे तर तीन महिन्यापूर्वी ज्यांच्या विरोधात तक्रार केली त्या तक्रारीचे निवारण तर सोडाच त्यांनीच डॉक्टर संपदा मुंडेंच्या विरोधात चौकशी लावली मात्र संपदा मुंडे यांची तक्रार मनावर घेऊन चौकशी केली नाही ही मोठी शोकांतिका आहे. भाऊबीज झाल्यानंतर दोघे बहिण भाऊ पुढील शिक्षणासाठी पीजी ला ऍडमिशन घेणार होते मात्र डॉक्टर संपदा मुंडेंचं दुर्दैव आहे की दोन दिवसातच आत्महत्या करण्याची वेळ आली. एवढी जिद्दी मुलगी आत्महत्या करू शकत नाही असा परिवारांचा सूर आहे. मात्र डॉक्टर संपदा मुंडे यांच्या विरोधात मोठे षडयंत्र असण्याचा दाट संशय कुटुंबांनी व्यक्त केला. खोटे रिपोर्ट तयार करून दे असे मनत अनेक वेळा राजकीय पुढारी अधिकारी यांनी डॉक्टर संपादा मुंडेंवर दबाव आणला होता. परंतु एवढे शिक्षण घेऊन अधिकारी म्हणून काम करत असताना मी खोटं काम करणार नाही हा शब्द तेथील हैवान व्यवस्थेला खटकला असावा म्हणूनच की काय डॉक्टर संपदा मुंडे यांचा खून केला असावा असा गौपेस्फोट नातेवाईकांनी केला. कुटुंबातील नातेवाईकांनी सांगितले की आम्हाला न्याय हवा आहे जर न्याय नाही मिळाला तर महाराष्ट्रातील प्रत्येक कुटुंबात डॉक्टर संपादा मुंडे घडू नये म्हणून न्याय हवा आहे.

## प्रभाग क्र.२६ (ब) मधून निवडणूकीच्या रिंगणात उतरणार शेख इलियास

### प्रभागातील मतदारांनी मतदाररूपी आर्शीवाद आणि सामान्य घरातील मुलांना बळ द्यावे





बीड । दिव्य न्युज

बीड नगर परिषदेच्या निवडणूकीचे वारे आता जोरात वाहू लागले असून प्रत्येक प्रभागात निवडणूकीसाठी भावी नगरसेवक उमेदवार म्हणून सज्ज झाले आहे. प्रभाग क्र.२६ ब मधून राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाकडून शेख इलियास हे निवडणूकीच्या रिंगणात उतरणार आहे. प्रभागातील नागरीकांनी मतदाररूपी आर्शिवाद आणि एक सामान्य घरातील मुलांना बळ द्यावे असे आवाहन शेख इलियास युनूस यांनी मतदारांना केले आहे. शेख इलियास यांनी गेल्या चार वर्षात या प्रभागतील २६ मधील अनेक भागात दर्जेदार विकास कामे केले असून यामध्ये सिमेंट रोड, सिमेंट नाली, हा परिसर नवीन असल्याने या ठिकाणी पिण्याच्या



पाण्याची कोणतीच सुविधा नव्हती शेख इलियास यांनी नगरपालिकेचे गटनेते फारूक पटेल, नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करून मा.धनंजय मुंडे यांच्याकडून या प्रभागातील विकास कामासाठी निधी प्राप्त करून घेतले त्यामध्ये मुख्य काम म्हणजे प्रभागात अनेक ठिकाणी पाईपलाईन टाकण्यात आले त्यामुळे परिसरातील नागरीकांनी पाणीचा प्रश्न निकाली लागला. या परिसरात अनेक ठिकाणी विद्युत पोल नाहीत शेख इलियास यांनी प्रयत्न करून या ठिकाणी विद्युत पोल मंजूर करून घेत अनेक ठिकाणी पोल बसविले आणि त्यावर लाईट बसवून परिसरातील अंधार दूर केला स्वच्छताचा प्रश्न निकाली काढून हा प्रभाग क्र.२६ ब कचरा मुक्त करून स्वच्छ केले म्हणून अशा धडाकेबाज कामगिरी करणाऱ्या युवकाला मतदारांनी ताकद देऊन आपल्या भागातील विकास कामे पुर्ण करून घेण्यासाठी आणि विकास कामासाठी जास्तीत जास्त निधी आणण्यासाठी शेख इलियास यांना प्रभाग क्र.२६ ब मधून मतदारांनी साथ द्यावी असे आवाहन ही शेख इलियास यांनी केले आहे.

# ‘स्थानिक’साठी शरद पवारांची रणनीती ठरली; भाजपसोबत युतीबाबत काय दिले आदेश?




राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) प्रमुख शरद पवार यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपसोबत कोणतीही युती केली जाणार नाही.

**स्थानिक पातळीवरील स्वातंत्र्य :** स्थानिक पातळीवरील नेत्यांना आघाडी व युतीचे गणित पाहून निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले आहे, मात्र भाजपसोबत जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

**पुण्यातील बैठक आणि रणनीती :** मुंबईतील बैठकीत शरद पवार, सुप्रिया सुळे आणि शशिकांत शिंदे यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि इतर महानगरपालिका निवडणुकांची तयारीचा आढावा घेतला.

दिव्य वार्ता

### वारंवार विचारले जाणारे प्रश्न

प्रश्न : शरद पवार यांनी भाजपसोबत युती का नाकारली?
उत्तर : पवार यांनी सांगितले की भाजपची विचारसरणी व कार्यपद्धती राष्ट्रवादी काँग्रेसशी विसंगत आहे.
प्रश्न : स्थानिक पातळीवरील नेत्यांना कोणते अधिकार दिले आहेत?
उत्तर: आघाडीचे गणित पाहून स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे.
प्रश्न: पुण्यातील बैठकीत कोण उपस्थित होते?
उत्तर: शरद पवार, सुप्रिया सुळे, शशिकांत शिंदे आणि पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप उपस्थित होते.
प्रश्न : या बैठकीचे महत्त्व काय आहे?
उत्तर: आगामी महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ही रणनीतिक बैठक निर्णायक ठरली आहे.

मुंबई । दिव्य न्युज

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना महत्त्वाचा आदेश दिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपशी युती करण्याबाबत ह्या सूचना करण्यात आल्या आहे. आघाडी आणि युतीचे गणित पाहून स्थानिक पातळीवरील नेत्यांना निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार दिले आहेत. भाजपशी युती टाळण्याचा आदेश कायम आहे.

मुंबईत शरद पवार, कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या उपस्थितीत पुणे शहर, पिंपरी चिंचवड आणि महाराष्ट्रातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत पुणे शहरातील पक्ष संघटना आणि निवडणूक तयारीचा सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. पुण्याचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी बैठकीतील चर्चेची माहिती देताना सांगितले की, भारतीय जनता पक्षाच्या अनागोंदी कारभाराला, शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आणि ढासळत्या प्राथमिक सुविधांना पुणेकर कंटाळले आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) हा जनतेच्या हिताचा विचार करणारा पक्ष म्हणून आगामी महानगरपालिका निवडणुकीत आघाडीवर राहील, असा विश्वास व्यक्त केला. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, शरद पवार यांनी बैठकीत मोठे विधान करताना स्थानिक नेत्यांना सांगितले की, युती आणि आघाडीचे गणित पाहून निर्णय घ्या, पण भाजपसोबत जायचे नाही. यामुळे पक्षांतर्गत स्थानिक पातळीवर आघाडीचे स्वातंत्र्य असले तरी भाजपशी कोणत्याही प्रकारची युती न करण्याची भूमिका ठाम राहील. स्थानिक पातळीवर भाजपसोबत कोणत्याही परिस्थितीत जायचं नाही. युती आणि आघाडीचं गणित पाहून निर्णय घ्या. फक्त भाजप सोबत युती नाही. अशा स्पष्ट सूचना शरद पवार यांनी दिल्या असल्याचे सांगितले जात आहे. ही बैठक महाराष्ट्रातील आगामी स्थानिक निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.






मुंबई :आज मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.खा.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रदेशाध्यक्ष मा.आ.श्री. शशिकांतजी शिंदे साहेब यांच्या व अन्य प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक संपन्न झाली.
या बैठकीस बीड जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील पक्ष संघटनेची स्थिती, आगामी निवडणुकांची रणनीती तसेच जनतेच्या प्रश्नांवर पक्षाची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान आदरणीय पवार साहेबांनी मार्गदर्शन करत पक्ष संघटनेने एकसंधतेने कार्य करून शिव - फुले - शाहू - आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करावा, सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष बीड जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी पूर्णपणे सज्ज असून जनतेच्या विश्वासाचा विजय निश्चित होईल असे मत बैठकीत मांडले.

# रुपालीताई, तुम्ही संपदाच्या मोठ्या बहीण चाकणकर कर्तव्यदक्ष तरी महिला म्हणून टार्गेट

## भुई बडवणाऱ्या टीकाकारांनो तुम्हाला पुरुष बदने वाचवायचा का?





### महिला आयोग पहिल्या दिवसापासून दक्ष-ॲड.प्रज्ञा खोसरे

फलटण मधील घटना माणुसकीला काळिमा फासणारी आहे रुपाली ताई कडून काही तासात यंत्रणा गतिमान करण्यात आली. तपास पथक वाढवली मात्र राजकीय विरोधक बीडच्या लेकी साठी रस्त्यावर आलेत का रुपाली ताई वर टीका करण्यासाठी हा प्रश्न आहे. रुपालीताई बीडला येणार होत्या आम्हाला तशा सूचना प्राप्त होत्या मात्र त्या एकदम आजारी पडल्या त्याना ॲडमिट केले गेले. मात्र विरोधक भाऊ मात्र अपशब्द वापरून टीका करू लागले जे स्त्री म्हणून अपमानकारक आहे. स्त्री टीका करायला सोपी असते म्हणून हे चालू आहे का असा सवाल महिला आयोग सदस्या प्रज्ञा खोसरे यांनी उपस्थित केला आहे.

बीड । दिव्य न्युज

टीव्ही उघडा, राज्यातील तीन मुख्य विरोधी पक्षाच्या पत्रकार परिषदा, सोशल मीडिया पहा डॉ संपदा मुंडे यांच्या आत्महत्येत आरोपी मदने बद्दल कमी चर्चा आहे, टिकेचे बाण रुपाली ताई कडे आहेत. महिला आयोगाच्या अध्यक्षा या नात्याने त्या फलटण मध्ये जाणाऱ्या पहिल्या नेत्या तर होत्याच सोबत तपास पथक वाढवणे फॉरेन्सिक चाचण्या वेगाने करण्याच्या सूचना देने हे कर्तव्य पार पाडले मात्र राजकीय विरोधकांनी पत्रकार परिषेदेचा अन्वयार्थ सोयीचा काढत राजकारण तापवले आहे. रुपाली ताई बद्दल अपशब्द वापरून केल्या जाणाऱ्या कॉमेंट पाहता कैमेरा आरोपीवर कमी आणि महिला आयोगावर जास्त असल्याचे

►► पान २ वर

### आमची बहीण गेली, आत्महत्याच विरोधकांनी भांडवल करू नये - भागवत तावरे

घडलेली घटना,झालेला तपास आणि आयोगाच्या सूचना या सर्व घटनाक्रमाने मांडल्या ,यात चारित्यहनन हा विषय कोठे होता? चारित्र्यहनन हा विरोधकांच्या डोक्यात होता म्हणून नसलेल्या गोष्टींच्या स्टोरी बनवून विषयांतर केले जात आहे. आम्ही डॉ संपदा मुंडे यांच्या न्यायासाठी सर्व पातळ्यावर प्रयत्न करत आहोत. आमचे नेतृत्व धनंजय मुंडे यांनी कुटुंबियांना भेट देऊन कठोर शब्दात भावना

►► पान २ वर

# कर्जापाई चिखलबीड येथील शेतकरी मुलाची आत्महत्या

वडवणी । दिव्य न्युज (शेख शरीफ)



वडवणी तालुक्यातील चिखलबीड येथील शेतकरी उत्तमराव तात्याबा नेहकर यांच्या ४२ वर्षीय मुलाने. पावसामुळे शेती पिकाचे झालेल्या अतोनात नुकसानीमुळे बँकेकडून घेतलेले कर्ज कसे फेडावे या निराशेतून शेतकऱ्याच्या मुलाने राहत्या घरी दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवार दि २७ रोजीच्या मध्यरात्री घडली आहे.

. तालुक्यातील डोंगर भागातील चिखलबीड येथील रहिवाशी असलेले शेतकरी उत्तमराव तात्याबा नेहरकर यांना दोन मुलं असून यावर्षी मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात अतोनात नुकसान झाले आहे.शेतात केलेला खर्चही निघणे मुश्किल झाले आहे. बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा डोंगर वाढतच चाललेला आहे. ते कशाने फेडावे,मुलाबाळांचा शिक्षणाचा खर्च कशाने करावा, संसाराचा गाडा कसा चालवावा आदी विवंचनेतुन शेतकरी पुत्र रामप्रसाद उत्तमराव नेरकर यांनी आत्महत्या केल्याची घटना घडली असून यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांना आई-वडील,पत्नी, दोन मुलं असा परिवार आहे.

# चौसाळा जि.प.गटातून मराठा सेवक पांडुरंग आवारे-पाटील निवडणूक लढविणार आणि जिंकणार

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका शिवसंग्राम मोठ्या ताकतीने लढविणार



बीड । दिव्य न्युज

शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांचे सूचनेवरून शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाध्यक्ष प्रा.सुभाष जाधव सर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसंग्राम भवन, नगर रोड, बीड येथे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका संदर्भात इच्छुक उमेदवारांची व पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.

स्थानिक स्वराज्य संस्था हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक असल्याने तसेच अनेक राजकीय अस्थित्यंतरे होऊनही शिवसंग्रामचे अस्तित्व हजारो/ शेकडो वर्षे टिकून ठेवण्यासाठी निवडणूका लढवून सज्ज होणेकरिता यावेळेस जिल्हा परिषदा, ►► पान २ वर

# चकलांबा पोलिसांची एसपी नवनीत कॉवत साहेबांच्या आदेशाला केराची टोपली




## चकलांबा येथे कायद्यात बदल : तपास पोना.कैलास गुजर (१३२३) यांना अकरा दिवस उलटूनहीआरोपी मिळेनात तसेच, कैलास गुजर यांचं आरोपींना पाठबळ

चकलांबा । दिव्य न्युज


एसपी नवनीत कॉवत साहेब चकलांबा पोलीस हे तुमच्या आदेशाचे पालन करीत नाहीय का? सात ते आठ दिवसापासून सलग पेपर ला बातमी तसेच, आरोपी गावात फिरताना गावातील नागरिक पाहत असल्यामुळे गावातील लोकांची चर्चा आहे की चकलांबा पोलिस तुमच्या आदेशाचे पालन करीत नाही. मग न्याय मागायचा कोणाकडे अशी चर्चा होत आहे.

गेवराई तालुक्यातील चकलांबा गावात किरकोळ वादातून तिघांना बेदम मारहाण गेल्या बारा दिवसांपूर्वी झाली होती.ही गंभीर घटना रविवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून,तिघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु होते. दरम्यान आरोपींना बारा ते तेरा दिवस उलटून गेले तरी अजून आरोपी राजरोस मोकाट फिरत आहे तपास पोलीसअधिकारी कैलास गुज्जर यांना विचारले असता ते म्हणतात आरोपी मला मिळत नाही आरोपी राजरोज गावातच आहेत.एसपी कॉवत साहेब तुमच्या राज्यात सुरक्षेचे तीन तेरा वाजले आहे.आरोपीला अजून सुद्धा अटक नाही. कैलास गुज्जर यांनी अजून सुद्धा आरोपींना अटक केलेली नाही फिर्यादी हा गरीब कुटुंबातला आहे बीडचे एसपी गरिबाला न्याय देतील का?न्याय मिळेल का?अशी गावात चर्चा आहे पण फिर्यादीला न्यायाची अपेक्षा होती फिर्यादीला आता असे वाटू लागले की गरीबाचा कोणी वाली नाही समोरचे आरोपी हे राजकारणी वशीलेबाजी आहे म्हणून त्यांचं कुणी काही करू शकत नाही.

►► पान २ वर

# आरटीओची दिवाळी झाली, अडीच लाखांची पावती फाडली

## तपासणी दरम्यान ५७ खासगी प्रवासी बसमध्ये आढळल्या त्रुटी



### आरटीओच्या ३ पथकांनी राबवली मोहीम

दिवाळीत खासगी बसच्या तपासणीसाठी तीन पथकांची स्थापना करण्यात आली होती. पथकाकडून बाहेरगावाहून येणाऱ्या व बाहेरगावी जाणाऱ्या ट्रॅव्हल्सची तपासणी करण्यात आली. त्रुटी आढळणाऱ्या ट्रॅव्हल्स मालकांवर कारवाई करण्यात आली.

### कोणकोणत्या कारणांमुळे कारवाई ?

सीटबेल्ट नसणे, परमिट नसणे, पासिंग नाही, रिफ्लेक्टर नाही, वाहनाची कागदपत्रे नाहीत, यांसह इतर कारणांवरून संबंधित ट्रॅव्हल्स मालकांना दंड देण्यात आला आहे. तसेच नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होत आहे.

बीड । दिव्य न्युज

येथील उपप्रादेशिक परिवहन विभागाने १४ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान प्रवासी वाहन तपासणी मोहीम राबवत ५७ खासगी प्रवासी बसमध्ये त्रुटी आढळून येताच पथकाने २ लाख ४१ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, दिवाळीमध्ये अतिरिक्त तिकीट दर आकारणी करणाऱ्यांवर सुद्धा कारवाई करण्यात आली आहे.

प्रत्येक वर्षी दिवाळीत प्रवासी वाहतूक वाढते. पर जिल्ह्यांतून नागरिक दिवाळीसाठी गावी येतात. बसगाड्या हाऊसफुल्ल असतात. मुंबई-पुण्याला बसचे आरक्षण मिळत नाही. बसचे आरक्षण मिळाले नाही तर, खासगी ट्रॅव्हल्सने प्रवास करावा लागतो. ही परिस्थीती ओळखून खासगी ट्रॅव्हल्स चालक अतिरिक्त तिकीट दर आकारून प्रवाशांची लूट करत असल्याने बीड येथील उपप्रादेशिक परिवहन विभागाने तपासणी मोहीम

►► पान २ वर

१४ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत प्रवासी वाहनांची तपासणी मोहीम राबवली जात आहे. तपासणी दरम्यान ३५ प्रवाशांकडून अतिरिक्त भाडे आकारल्याचे आढळून आले. त्या सर्व प्रवाशांना अतिरिक्त तिकीट म्हणून आकारलेले १४ हजार रुपये ट्रॅव्हल्स मालकांकडून प्रवाशांना परत मिळवून दिले. तपासणी मोहीम सुरू असल्याने चालकांनी वाहनांची कागदपत्रे सोबत ठेवावीत. **बालाजी धन्वे,**
**उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड**



**बीड नगर पालिकेचे माजी सभापती सचिन आप्पा सोनवणे यांचे निवासस्थानी जिल्ह्यातील संपादक, पत्रकार बांधव यांच्यासोबत दीपावली स्नेहमिलन मोठ्या उत्साहात संपन्न यावेळी कश्मकश दिव्यवार्ताचे संपादक मुहम्मद अबुबकर यांना दिपावलीची शुभेच्छा देतांना सचिन आप्पा सोनवणे**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०